# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत**

**(१) ५३७१० (२२-०८-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबींवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, राज्यभरातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-१०-२०१८) :** (१), (२) व (३) राज्य शासनाने राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा/प्रोत्साहनपर रकमेचा लाभ देण्यासाठी शासन निर्णय दि. २८/०६/२०१७ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ जाहीर करुन त्यानंतर वेळोवेळी त्यात सुधारणा केल्या ज्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळेल. त्याअनुषंगाने दि. १०/०९/२०१८ अखेर एकूण ३९.११ लाख खातेदारांना रू. १६,०९१ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथे यंत्रमाग धारकांकरीता वीज दर एकच ठेवण्याबाबत**

**(२) ६७८३३ (२७-०१-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील मालेगाव येथे यंत्रमाग धारकांकरीता वीज दर महिन्याला कमी-जास्त प्रमाणात वाढवून येत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.उर्जा मंत्री यांना माहे, डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान याबाबत कार्यवाही दर एकच ठेवण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने या पत्राची दखल घेत यंत्रमागासाठी एकच दर ठेवण्यात यावा या मागणी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) ग्राहकांचे वीज दर ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र वीज नियामक आयोगास आहेत. दिनांक ०७.११.२०१५ च्या शासन निणर्यानुसार लघुदाब यंत्रमाग धारकांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याकरिता महावितरण कंपनीस देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा कायम ठेवण्यात आली असून दिनांक ०१.११.२०१६ पासून वाढीव वीज दर संबंधित यंत्रमाग धारकांनी भरावयाचे आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने महानगरपालिका क्षेत्रात प्राप्त वन हक्क दावे निकाली काढण्यासाठी उपविभागीय समिती स्थापन केल्याबाबत**

**(३) ६८३६५ (२७-०१-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने वन हक्क कायदा लागू करण्यापूर्वी महानगरपालिका क्षेत्रात प्राप्त वन हक्क दावे निकाली केली काढण्यासाठी उपविभागीय समिती स्थापन केली होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच ठाणे, नाशिक, मुंबई महानगरपालिकांनी आपले अभिप्राय शासनास १ वर्षापूर्वीच सादर केले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभिप्राया बाबत तसेच वन हक्क कायद्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय, असल्यास, त्याबाबत शासनाने परिपत्रकाद्वारे नागरीकांना ज्ञात केले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०९-२०१८)** :(१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.वहका-२०१५/प्र क्र.६१/का.१४, दि. ८ सप्टेंबर, २०१५ अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम, २००८ व सुधारित नियम, २०१२ अंतर्गत नगरपरिषदा/नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रामध्ये वॉर्ड समिती, उप विभागीय स्तरीय समिती व जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

---

**वीजदेयक भरण्यासाठी महावितरण कंपनीने नेमलेल्या एजन्सीने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४) ८०९२८ (२८-११-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीजदेयक भरण्यासाठी महावितरण प्रशासनाच्या वतीने कार्यरत एजन्सीच्या माध्यमातुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठविण्यात आला असून या गैरव्यवहाराबाबत एजन्सीला काळ्या यादीत टाकण्याची शिफारस वरिष्ठ कार्यालयाला करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे. पुणे, औरंगाबाद व कोल्हापूर या परिमंडळामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) संबंधित एजन्सींचे करार रद्द करण्याची कार्यवाही महावितरणमार्फत करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुदे (ता.कर्जत, जि.रायगड) येथिल नवीन रोहित्र अदयापही सुरु करण्यात आले नसल्याबाबत**

**(५) ८१२४२ (२८-११-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदे (ता.कर्जत, जि.रायगड) येथे मागील तीन महिन्यांपूर्वी नवीन रोहित्र बसविण्यात आले परंतु अदयापही ते सुरु करण्यात आले नसल्याने येथील वीज ग्राहकांना कमी दाबाने वीज पुरवठा होत असून वीज पुरवठा खंडित होण्यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब नुकतीच माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदुनसार वीज पुरवठा सुरळित होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) रायगड जिल्हयातील पनवेल ग्रामीण विभागांतर्गत कर्जत तालुक्यातील मुद्रे परिसरातील काही ग्राहकांना संध्याकाळी काही कालावधीसाठी कमी दाबाने विद्युतपुरवठा होत असल्याच्या तोंडी तक्रारी ऑक्टोबर, २०१६ च्या दरम्यान प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार महावितरण कंपनीने पायाभूत आराखडा-२ योजनेतील तरतुदीनुसार १०० के.व्ही.ए. क्षमतेच्या नवीन रोहित्राची उभारणी करण्याचे काम दि. २४.१०.२०१६ रोजी सुरु केले. सदर काम करत असताना स्थानिक नागरिकांकडून अडथळा आल्याने काही दिवस काम रखडले होते. परंतु, स्थानिकांबरोबर चर्चा करुन रोहित्राची जागा निश्चित करुन सदर काम डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण करण्यात आले. त्यानंतर विद्युत निरीक्षक यांची परवानगी घेऊन सदर रोहित्र दिनांक १०.०१.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आले. त्यानंतर मुद्रे परिसरात योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

---

## राज्यातील इमारतीमंध्ये बसविण्यात येणाऱ्या उद्वाहनाची (लिफ्ट) परवानगी देण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर देण्याबाबत

**(६) ८२५२६ (२८-०४-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) राज्यातील कोल्हापूर शहराचा विकास दिवसेंदिवस वाढत असून त्या ठिकाणी शासनाच्या नियमानूसार नव्याने इमारती बांधकामाची संख्या वाढत आहे परंतू, अजूनही इमारतीमध्ये बसविण्यात येणाऱ्या उद्वाहनाची (लिफ्ट) परवानगी ही मुख्य विद्यूत निरिक्षक, मुंबई यांचे कडून घ्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामूळे नागरिकांचा व विकासकांचा वेळ व पैसा यांचा अपव्यय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हा अपव्यय टाळण्यासाठी सदरचे अधिकार स्थानिक जिल्हयाच्या ठिकाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक ०२.१०.२०१६ पासून मुख्य विद्युत निरीक्षक कार्यालयातर्फे उद्वाहन उभारणीस परवानगी व उद्वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती या दोन्ही सेवा, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत "ऑनलाईन प्रणालीवर कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यामुळे नागरिक व विकासक त्यांच्या सोयीने उद्वाहन उभारणीसाठी अथवा अनुज्ञप्तीसाठी कुठुनही ऑनलाईन पध्दतीने अर्ज करुन परवानगी वा अनुज्ञप्ती प्राप्त करु शकतात.

---

**परांडा (जि.उस्मानाबाद) विभागात शेतीसाठी ८ तासांऐवजी २४ तास विद्युत पुरवठा करणेबाबत**

**(७) ८३४६३ (२८-११-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा (जि.उस्मानाबाद) विभागात मागील वर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे सर्व सिंचन प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेले असतानाही शेतीसाठी फक्त ८ तासच विद्युत पुरवठा सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात शेतीसाठी २४ तास विद्युतपुरवठा करावा अशी विनंती लोकप्रतिनिधींनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री व मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) सद्यस्थितीत परांडा, जि.उस्मानाबाद येथील सर्व कृषी ग्राहकांना शेतीसाठी मा. वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार दिवसा ८ तास व रात्री १० तास असे चक्राकार पध्दतीने ३ फेज वीज पुरवठा करण्यात येत आहे.
(२) याबाबतचे निवेदन महावितरण कंपनीस दिनांक ११.०६.२०१७ रोजी प्राप्त झाले आहे.
(३) परांडा गांव आणि भूम-वाशी या गावातील सर्व कृषीपंपाना मा. वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार दिवसा ८ तास व रात्री १० तास असे चक्राकार पध्दतीने ३ फेज वीज पुरवठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील दिवा विभागात मीटरचे छायाचित्र न घेता वीजदेयक पाठविण्यात येत असल्याबाबत**

**(८) ९००१३ (०९-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दिवा विभागात मीटरचे छायाचित्र न घेता हजारो रुपयांचे वीज देयक महावितरणकडून पाठविण्यात आल्याचे दिनांक १९ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याविषयी तक्रार करण्यास जाणाऱ्या नागरिकांना निम्मे वीज देयक भरण्याची सक्ती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत वीज मीटरची छायाचित्रे न घेता वीज देयक पाठवणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महावितरण कंपनीच्या ठाणे -३ विभागाअंतर्गत शिळ उपविभागात दिवा-१ व दिवा-२ शाखा कार्यालयाअंतर्गत एकूण ५१,७०४ वीज ग्राहक आहेत. मे.रुद्रा सिस्टीम, नाशिक या एजन्सीला महावितरण कंपनीमार्फत मीटर वाचनाचे काम देण्यात आले होते. त्यांच्याविरुध्द मीटर वाचनाच्या कामाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. प्रथम त्यांचेविरुध्द कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार रु. ७२,८७४/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता ठाणे-३ विभाग यांनी मे.रुद्रा सिस्टीम नाशिक यांचे मीटर वाचनाचे काम बंद केलेले आहे. तसेच मे. रुद्रा सिस्टीम नाशिक या एजन्सीला महावितरण कंपनीतून ३ वर्षासाठी बंदी करणे किंवा बॅन करण्याबाबत खुलासा विचारण्यात आला असून त्याबाबत पुढील कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहयोग इंडस्ट्रीयल को.ऑप.सोसायटी (ता.निलंगा, जि.लातूर) या संस्थेची मान्यता रद्द करण्यात आल्याबाबत**

**(९) ९५१०५ (१०-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहयोग इंडस्ट्रीयल को.ऑप.सोसायटी (ता.निलंगा, जि.लातूर) या संस्थेस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून मौ.दगडवाडी (ता.निलंगा, जि.लातूर) या ठिकाणी जैविक कोळसा प्रकल्पासाठी एकूण ४७५.५८ लक्ष इतके अर्थसहाय्य मंजूर करुन पहिला हप्ता रु.१५०.०० लक्ष दिनांक २३ जानेवारी, २०१२ रोजी वा त्यासुमारास देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेने इमारत बांधकाम पूर्ण न करता, अपूर्ण ठेवून उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केल्याने संस्थेची मान्यता रद्द करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना दिनांक ३ मे, २०१७ रोजी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण लातूर यांना पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जिल्हा उपनिबंधक लातूर यांनी या संस्थेचे लेखापरिक्षण करुन गैरव्यवहार आढळल्यास संस्थेविरुध्द फौजदारी कार्यवाही करावी, असे पत्र सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, लातूर यांना दिनांक ३ मे, २०१७ रोजी दिले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, लातूर यांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर संस्थेने रुपये १४७.०० लक्ष खर्च केलेला आहे. तर उप लेखा परीक्षक सहकारी संस्था (पणन), लातूर व लेखा परीक्षक श्रेणी-१, सहकारी संस्था, लातूर यांनी अनुक्रमे लेखा परीक्षण व चाळणी लेखा परिक्षण केलेले असून त्यात सदर संस्थेने सकृतदर्शनी अपहार/गैरव्यवहार केल्याचे आढळून आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीकरिता वारसा हक्काची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१०) ९७४१६ (३०-१२-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन १९७५ च्या सफाई कामगारांच्या नियुक्तीकरिता वारसा हक्काची अंमलबजावणी करण्याबाबत लाड-पागे समितीच्या शिफारस करुनही याबाबत अद्यापी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीकरिता वारसा हक्काची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०८-२०१८) :** (१) ते (३) राज्यात लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत वारसा हक्काची अंमलबजावणी करण्याबाबत लाड पागे समितीच्या शिफारशी आणि शासनाचे प्रचलित सर्वप्रकारचे दस्तऐवज जसे की, शासन पत्र, परिपत्रक, निर्णय, नियम, अधिनियम, अधिसूचना वगैरे यानुसार सफाई

कामगारांच्या नियुक्तीबाबत लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत वारसा हक्काची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश संबंधितांना देण्यात आलेले आहेत.

---

## आरे कॉलनीमध्ये सर्पदंशाने मुलाचा मृत्यू झाल्याबाबत

**(११) ९९२५० (२९-१२-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे कॉलनी (गोरेगाव, मुंबई) मधील वणीचा पाडा येथे राज झोप या ७ वर्ष वय असलेल्या मुलाला सर्पदंश झाल्याने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे कॉलनीत २७ आदिवासी पाड्यात ५० ते ६० हजार लोक राहत असून येथे यापूर्वीही सर्पदंशाने १० ते १२ नागरिकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने त्वरित इलाज होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मृतांच्या परिवारास शासन कोणती आर्थिक मदत देणार आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) पोलिस ठाणे, गोरेगाव यांच्या अभिलेखानुसार मागील ४ वर्षात सर्पदंशाने एकूण ११ व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. त्यापैकी ३ व्यक्ती आदिवासी आहेत.

(३) वरिष्ठ पोलिस निरीक्षक, आरे, गोरेगाव, पोलिस ठाणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे कॉलनी, गोरेगाव यांच्या अधिनस्त दवाखान्यात सर्पदंशावरील लस उपलब्ध करुन देण्याबाबत पत्राने कळविले आहे.

(४) मृत राज रमेश झोप याच्या परिवारास दि. १३/१२/२०१७ रोजी रु. ५०,०००/- तातडीची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

---

## यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा आदिवासी प्रकल्प विभागात सुमारे ३२० पदे रिक्त असल्याबाबत

**(१२) १००१३२ (२९-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा आदिवासी प्रकल्प विभागात सुमारे ३२० पदे रिक्त असल्याने आदिवासींच्या विकासात अडथळे येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०८-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

पांढरकवडा आदिवासी विकास प्रकल्प कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत १०० पदे रिक्त आहेत.
(२) व (३) विद्यार्थी संख्या अभावी काही आश्रमशाळा बंद झाल्या आहेत. त्यामुळे तेथील पदांचे समायोजन अन्य आश्रमशाळेत करण्याची कार्यवाही सुरु होती. अपर आयुक्त, अमरावती कार्यक्षेत्रातील अनुसूचीत क्षेत्रातील शिक्षक संवर्गाची ४९ व शिक्षकेतर ६ असे एकूण ५५ पदे भरण्यासाठी जाहीरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच पदोन्नतीची व प्रतिनियुक्तीची पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील ३३/११ केव्हीच्या विदयुत उपकेंद्राची क्षमता ५ एमव्हीए पर्यंत वाढविण्याबाबत**

**(१३) १०२१८६ (०१-०१-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील ३३/११ केव्हीच्या विद्युत उपकेंद्राची क्षमता ५ एमव्हीए पर्यंत वाढविण्यात येईल असे आश्वासन मा.ऊर्जा राज्यमंत्री यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत वाशिमच्या अधीक्षक अभियंता कार्यालयाकडून रीतसर प्रस्ताव तयार करुन मुख्य अभियंता कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रस्तावावर निर्णय घेवून व निधीची तरतूद करुन येथील वीज उपकेंद्राचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) पं.दिनदयाळ ग्राम ज्योती योजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही दापूरा व पोहरादेवी उपकेंद्राचे क्षमतावाढीचे काम पूर्ण झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निंबोडे दांडवाडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील आदिवासी वाडीमधील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला स्वतंत्र वीजमीटर नसल्याबाबत**

**(१४) १०४७६७ (०४-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निंबोडे दांडवाडी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील आदिवासी वाडीमधील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला स्वतंत्र वीजमीटर नसल्यामुळे जवळ असलेल्या गृहप्रकल्पातून बांबूच्या आधारे विद्युत पुरवठा करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे धोकादायक पद्धतीने होत असलेल्या वीज पुरवठयामुळे दुर्घटना होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) दि. ०७.०२.२०१८ रोजी खालापूरचे महावितरणचे उपविभागीय अधिकारी व सहाय्यक अभियंता यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट दिली असता असे निदर्शनास आले की, सदर आदिवासी शाळेमध्ये कुठल्याही प्रकारचा अधिकृत/अनधिकृत वीज पुरवठा नाही व त्यांनी जवळच्या गृह प्रकल्पातून अनधिकृत वीज पुरवठा घेतलेला नाही. सदर शाळेस भेट दिली असता व तेथील मुख्याध्यापकांशी चर्चा केली असता असे निदर्शनास आले की, त्यांनी यापूर्वी शाळेच्य विद्युत जोडणीसाठी महावितरण कंपनीकडे अर्ज केलेला नाही व त्यांची मागणी सुध्दा नव्हती. सदर बाब लक्षात आल्यानंतर महावितरण उपविभागीय अधिकारी यांनी त्यांना नवीन विद्युत जोडणीकरिता आवश्यक माहिती दिली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धायरी (ता.हवेली, जि.पुणे) येथील रोहित्राच्या आजूबाजूची जागा सुरक्षित करण्याबाबत**

**(१५) १०५१९२ (०४-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धायरी (ता.हवेली, जि.पुणे) येथील अंतर्गत भागात धोकादायक रोहित्र असून त्याच्या आजूबाजूची जागा सुरक्षित करण्यासाठी जाळी, कुंपण वा पत्र्याचे आच्छादन या उपाययोजना होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहित्राभोवती सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक कुंपण वा जाळ्या नसणे, बहुतांश रोहित्र रहिवाशी संस्था व रहदारीच्या रस्त्यांमध्ये असणे, रोहित्राभोवती लहान मुलांचा वावर असणे, यामुळे दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन संबंधित महावितरण कार्यालयाकडे लेखी पत्रव्यवहार, बैठका घेऊन सुद्धा याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत तसेच रोहित्रास संरक्षित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यामार्फत धोकादायक विद्युत रोहित्रांची (कुंपण व बसविलेले रोहित्र, जाळी न बसविलेले रोहित्र, पत्र्यांचे आच्छादन नसलेले रोहित्र, प्लिंथ (ओटा) खराब झालेले रोहित्र) पाहणी करण्यात आली असून ४ धोकादायक विद्युत रोहित्र सुरक्षित करण्यासाठीची कामे पूर्ण करण्यात आली असून ४ ठिकाणांची रोहित्रे सुरक्षित करण्याची कामे प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) शहर परिसरातील अनेक भागात रस्त्यांच्या मध्यभागी असणारे खांब धोकादायक झाल्याबाबत

**(१६) १०६१६२ (०४-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) शहर परिसरातील अनेक भागात रस्त्यांच्या मध्यभागी असणारे मोडकळीस आलेले व धोकादायक विजेचे खांब तसेच जीर्ण झालेल्या विजेच्या तारांमुळे नागरिकांना रहदारी करताना अडचणीचे व धोकादायक झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरेआहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पनवेल महानगरपालिकेने महावितरण कंपनीला नागरिकांना रहदारी करताना अडचणीचे व धोकादायक ब्रिटीश कालीन विजेचे खांब व तारा बदलण्यासाठी निवेदन देऊनसुध्दा अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही महावितरण कंपनीकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१७ च्या सुमारास मा.ऊर्जा मंत्री यांनी विज ग्राहकांच्या मेळाव्यात सगळे प्रश्न महावितरणचे संबंधित अधिकारी तीन महिन्यात सोडवतील अशी घोषणा केलेली असताना देखील विज खांब व विज तारा काढण्यासाठी सुमारे २९ लाख ६५ हजार रूपये किंमतीच्या आराखडयाला महावितरण कंपनीच्या अधिका-यांनी मंजूरी दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने करून रहदारीला अडचणीचे ठरणारे धोकादायक विजेचे खांब व तारा काढण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) शहराचे विकास प्राधिकरणाची कामे पनवेल महानगर पालिकेतर्फे केली जातात. पनवेल (जि.रायगड) शहर परिसरातील वीजेचे खांब पूर्वी रस्त्याच्या कडेला होते. पनवेल महानगर पालिकेद्वारे केलेल्या पनवेल शहर परिसरातील रस्त्यांच्या रुंदीकरणामुळे काही ठिकाणी वीजेचे खांब हे रस्त्यावर आले आहेत.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

पनवेल महानगरपालिकेने महावितरण कंपनीला रस्त्यांवर असलेले वीजेचे खांब व तारा बदलण्यासाठी दिलेल्या यादीनुसार सर्वेक्षण करुन पनवेल (शहर) विभाग, महावितरणतर्फे रु.१२.१८ लाख रक्कमेचे अंदाजपत्रक तयार आले आहे. दिनांक ३०.१०.२०१७ रोजीच्या पत्रानुसार या कामांची अंमलबजावणी होण्याकरिता व खर्च करण्याबाबत संमतीपत्र देण्याची विनंती पनवेल महानगरपालिकेस करण्यात आली आहे. महानगरपालिकेने खर्च करण्यासाठी संमतीपत्र न दिल्यामुळे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले नाही. तसेच पनवेल शहर भागातील टपाल नाका या भागात रस्त्यावरील असलेल्या उपरी लघुदाब वाहिनी भूमिगत करुन देखभाल व दुरुस्तीचे काम करण्याकरिता अंदाजपत्रक O & M या योजनेत मंजूर करण्यात आले असून या अंदाजपत्रकाची रक्कम रु.३२.९२ लाख इतकी आहे व काम पूर्ण करण्यासाठी निविदा प्रसारित करण्यात आली आहे. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावर असलेले एकूण १२ खांब काढण्यात येतील.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील उपरी तारमार्ग भूमिगत करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, पनवेल यांनी उप आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना दिनांक २२.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील शिवाजी गृहनिर्माण संस्थेत झालेला आर्थिक गैरव्यवहार**

**(१७) १०८०१३ (०५-०४-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील शिवाजी गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेच्या मालमत्तेमध्ये तसेच पैशांमध्ये गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री यांचेकडे दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संस्थेचे अध्यक्ष श्री.कारले यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक, अमरावती यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. सहकार मंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०९-२०१८) :** (१) व २) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून संस्थेचे अध्यक्ष श्री. युवराज कराळे यांनी संस्थेच्या जमिन विक्री व्यवहारात गैरव्यवहार व अपहार केला असल्याचे आढळून आले आहे. तसेच श्री. कराळे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन वरुड येथे F.I.R / गुन्हा नोंद करण्याकरिता फिर्याद नोंदविलेली आहे. सदय:स्थीतीत सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री समर्थ को.ऑप.हौ.सो.लि., मालाड (पूर्व), मुंबई या संस्थेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१८) १०८४०४ (२३-०४-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री समर्थ को.-ऑप.हौ.सो.लि., महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी, दिंडोशी नगर, मालाड (पूर्व), मुंबई या संस्थेच्या गैरव्यवहाराबाबत संस्थेतील सदस्यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांच्याकडे तक्रार दाखल केल्याचे दिनांक ३ मे, २०१२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने श्री समर्थ को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संस्थेतील कार्यकारणीने प्रशासकाशी संगनमत करुन गैरकारभार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०९-२०१८)** : (१) दि.२०.१२.२०११ व दि.१८.६.२०१३ व त्यानंतर उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांच्याकडे या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) नाही.

संस्थेतील गैरव्यवहाराबाबतच्या तक्रारीस अनुसरुन नव्हे तर संस्थेच्या समितीची मुदत संपल्याचे निदर्शनास आल्यावरुन प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) अशी कोणतीही तक्रार उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा या कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगरापूर व मुळशी (ता.भोर, जि.पुणे) या गावांच्या उपविभागातील कामे तातडीने सुरु करण्याबाबत**

**(१९) १०८८०४ (०४-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरापूर व मुळशी (ता.भोर, जि.पुणे) या गावांच्या उपविभागातील कामे तातडीने सुरु करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, महावितरण, मुळशी विभाग पुणे यांना दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
दिनांक ०५.११.२०१७ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मुळशी तालुक्यातील मौजे खानु-डीगे वस्ती, बंडे वस्ती, चांदर-टाकी या गावातील कामे सुरु करण्याबाबतचे पत्र महावितरणच्या मुळशी विभागास प्राप्त झाले आहे.
(२) सदर पत्रामध्ये नमूद केलेल्या गावांपैकी मौजे खानु-डीगे वस्ती, बंडे वस्ती, चांदर -टाकी वस्ती या गावातील कामे DPDC योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आलेली आहेत. यामध्ये वरील गावांकरिता १.७२ कि.मी. उच्चदाब वाहिनी उभी करुन ६३ के.व्ही.ए चे रोहित्र उभारण्यात आलेला आहे. तसेच रोहित्रापासून चांदर गावाकरिता ०.९६ कि.मी. ची लघुदाब वाहिनी, टाकी वस्ती गावाकरिता ०.०६ कि.मी. लघुदाब वाहिनी व खानु-डीगे वस्ती गावाकरिता ०.४५ कि.मी.ची लघुदाब वाहिनी उभारण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई आणि ठाणे महानगर परिसरातील आदिवासी पाड्यांमध्ये अद्यापही वीज पुरवठा सुरू न केल्याबाबत**

**(२०) १०९३९३ (०४-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि ठाणे महानगर परिसरात आदिवासी पाडे असून पाड्यांवर स्वातंत्र्यानंतर अद्यापही वीज पोहोचलेली नसल्याने सदर भागात वीजपुरवठा सुरु करण्यासाठी महावितरणने सौभाग्य योजनेतंर्गत सदरचा उपक्रम राबविण्याचा दि.२ जानेवारी,२०१८ रोजी निर्णय घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच वीजेपासून वंचित राहिलेल्या आदिवासी पाड्यांना वीजपुरवठा करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

परंतु मुंबई महावितरण अंतर्गत येणाऱ्या सर्व आदिवासी पाड्यांना विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये वागळे इस्टेट विभागांतर्गत येऊन येथील वणीचा पाडा व जांभुळ पाडा येथे अनुक्रमे ७० आणि ३५ घरे असून तेथे विद्युत पुरवठा उपलब्ध नाही.

(२) वणीचा पाडा व जांभुळ पाडा या आदिवासी पाड्यांच्या विद्युत पुरवठयासाठीचे प्रस्ताव डी.पी.डी.सी योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आले असून, त्याकरिता लागणाऱ्या निधींची तरतूद अद्यापपर्यंत झालेली नाही. दरम्यान वनविभागाच्या परवानगीसाठी प्रस्ताव पूर्वीच पाठविला असून, तो प्रलंबित आहे. सदर पाडयांचे सौरऊर्जेमार्फत विद्युतीकरण करण्यासाठी प्रस्ताव महाऊर्जा (MEDA) यांना पाठविण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात शेतीसाठीचा वीज पुरवठा दिवसा सुरू करण्याबाबत**

**(२१) १०९५२९ (०४-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत**

**भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात गत काही दिवसांपासून गोदाकाठ भागात वीज पुरवण्याच्या वेळांत महावितरणने कोणतीही पूर्व सूचना न देता बदल करुन रात्री वीज पुरवठा सुरु केल्याने येथील शेतक-यांना पिकांना पाणी देणे जिकिरीचे होत असल्याचे दि.१२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात वन्यश्वापद असल्याने रात्री पिकांना पाणी देण्यास जाण्याने शेतकऱ्यांच्या जिवीताला धोका असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दिवसा वीजपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

वीज नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास वीजपुरवठा करण्यात येत होता.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे अनियमित भारनियमन व उर्जा पुरवठ्यासंबंधी इतर समस्यांचे निवारण होत नसल्याबाबत

**(२२) १०९५३७ (०४-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे अनियमित भारनियमन व उर्जा पुरवठ्यासंबंधी इतर समस्यांचे निवारण होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये उक्त प्रकरणी धडक मोर्चा, धरणे आंदोलन झाल्यानंतर दिलेल्या आश्वासन पत्राची अद्यापही संबंधितांनी अंमलबजावणी न केल्याने मालेगांव शहरातील यंत्रमाग धारकांची तसचे इतर नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार समस्यांचे निवारण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक ०५.१०.२०१७ रोजी मा. लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली धडक मोर्चा/धरणे आंदोलन मालेगाव विभागीय कार्यालयासमोर करण्यात आले होते. त्या दरम्यान उपस्थित केलेल्या समस्यांचे महावितरण कंपनीकडून निराकरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) शहरातील रौनकाबाद फिडर वरुन होणारा वीज पुरवठा खंडित होत असल्याबाबत**

**(२३) १०९५४१ (०४-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) शहरातील रौनकाबाद फिडर वरुन ज्या भागात विज पुरवठा होत आहे त्या भागातील रहिवाश्यांना वारंवार विज खंडित होत असल्यामुळे त्रास होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांना वारंवार तक्रारी करुनही अदयापही कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) :** (१) मालेगाव (ता.जि.नाशिक) शहरातील आझादनगर उपकेंद्रामध्ये तांत्रिक अडचणीमुळे १० एमव्हीएचा पॉवर ट्रान्सफॉर्मर दि. ३०.१२.२०१७ रोजी २१.३० वाजता नादुरुस्त झाला होता. या घटनेमुळे रौनकाबाद, आजीमनगर, नजमाबाद फिडरचा पुरवठा खंडीत झाला होता. यावर तात्काळ उपाययोजना म्हणून ६ तासांचे भारनियमन अंमलात आणून दुस-या फिडरवरती तात्पुरता भार टाकून विद्‌युत पुरवठा सुरु करण्यात आला. महावितरण कंपनीकडून तातडीने नादुरुस्त पॉवर ट्रान्सफॉर्मर बदलून दि. ०४.०१.२०१८ रोजी सकाळी २.०० वाजता सदर वाहिनीचा विद्‌युत पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेती पंपाच्या वीज जोडण्या देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२४) १०९७५० (०४-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यातील शेती पंपाच्या वीज जोडण्या देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवून माहे जुलै, २०१८ पर्यंत प्रलंबित वीज जोडण्या देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात किती कृषी पंप प्रलंबित आहेत व त्यांना वीज जोडणी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यात मार्च, २०१८ अखेर २४९३५७ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. राज्यात पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणालीद्वारे (HVDS) वीज पुरवठा करण्यासाठी लागणारा रु.५०४८ कोटीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत महावितरण कंपनीकडून निविदाप्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे गत दोन महिन्यांपासून वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याबाबत**

**(२५) १०९७९८ (०४-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे गत दोन महिन्यांपासून संवदगांव गावठाणातील रोहित्र चार वेळेस नादुरुस्त झाले असून काही दिवसांपासून वीज पुरवठाही वारंवार खंडित होत असल्याने तेथील ग्रामस्थांनी विभागास निवेदन दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने रोहित्र दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे. तथापि अशा आशयाचे निवेदन महावितरण कंपनीस प्राप्त झालेले नाही.

(२) सवंद गावातील रोहित्र गेल्या दोन महिन्यात तीन वेळा नादुरुस्त झाल्याने सदर परिसराची पाहणी करण्यात आली तेव्हा सवंद गावातील बहुतांश घरांमध्ये अनधिकृतपणे वीज वापर दिसून आला. तसेच गावाजवळ असलेले कृषीपंप ग्राहक देखील सवंदगाव गावठाणाच्या लघुदाब वाहिनीवर रात्रीच्या वेळी आकडे टाकून अनधिकृत वीज वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्याने लघुदाब वाहिनीच्या गाळयांमध्ये १० स्क्वे. एम.एम. आकाराची सर्वीस वायर टाकून हा अनधिकृत वीज वापर रोखण्यात आला. त्यामुळे या रोहित्रावर अनधिकृत वीजेचा वापर बंद होऊन दि.२६.९.२०१७ रोजी बदलण्यात आलेल्या रोहित्रावरुन सवंद गावास नियमित वीजपुरवठा चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयातील दिव्यांगांच्या मागण्यांबाबत

**(२६) ११०१४३ (२१-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात दिव्यागांना तीन टक्के निधी वितरित करावा, व्यवसायासाठी २०० फूट जागा उपलब्ध करुन द्यावी तसेच शासकीय नोकरीत १० टक्के आरक्षण द्यावे, यासह अनेक मागण्यांकरिता दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिव्यांगांच्या उपरोक्त मागण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) अपंग व्यक्तींच्या हक्कांचा कायदा, २०१६ च्या अनुषंगाने विविध कलमान्वये संबंधित प्रशासकीय विभागांमध्ये कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणघाट शहर व तालुक्यात (जि.वर्धा) निवृत्तीवेतन धारकांना बँक खात्यांवर कमीत कमी शिल्लक रक्कम ठेवण्याच्या अटीतून सवलत देण्याबाबत

**(२७) ११०८२० (२०-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) शहर व तालुक्यात पेन्शन धारकांचे बँकांमध्ये खाते असून या खात्यांवर कमीत कमी २ हजार रुपये ठेवावे लागत असल्याने निवृत्तीवेतन धारक ग्राहकांना आर्थिक त्रास सोसावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृद्धांना ५०० ते ७०० रुपये निवृत्तीवेतन येत असून कमीत कमी २ हजार खात्यावर शिल्लक ठेवण्याबाबतचा प्रश्न त्यांच्या समोर निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त वृद्ध निवृत्तीवेतन धारकांना कमीत-कमी रक्कम शिल्लक ठेवण्याच्या अटीतून सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०८-२०१८) :** (१) होय.
(२) संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमहा रु.६००/- इतके अनुदान देण्यात येते.
(३) संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांना मिनिमम बॅलन्सची मुभा देण्याबाबत जिल्हास्तरावर बँकेशी चर्चा करुन शासकीय योजनेचा लाभ घेणाऱ्या सुक्ष्म खातेदाराचे बँक खाते हे साधारण खात्यामध्ये न ठेवता जनधन खात्यामध्ये वळती करण्याबाबत जिल्हास्तरावरुन जिल्हा अग्रणी बँकेस निदेश देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील शासनाच्या सौभाग्य वीज योजनेतंर्गत लाभार्थ्यांना जोडणी देण्याबाबत**

**(२८) ११०९४३ (०४-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील शासनाच्या सौभाग्य वीज योजनेतंर्गत उक्त तालुक्यांतील सुमारे ५५० कुटूंबियांची यादी मंगळवेढा महावितरण विभागाला प्राप्त झाल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंगळवेढा तालुक्यातील ५५० कुटूंबियांना वीज जोडणी देण्यात येणार असल्याचे आश्वासित करण्यात आले परंतू अद्यापही वीज वितरण कंपनीने जोडणी दिली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत योजना प्रभावीपणे व तातडीने राबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
माहे जानेवारी, २०१८ पासून पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण भागातील ५४१ घरांना व मंगळवेढा तालुक्याच्या ग्रामीण भागातील २२८ घरांना असे एकूण पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील ७६९ घरांना वीज पुरवठा करण्यात आला आहे. उर्वरित घरांना सौभाग्य

योजनेअंतर्गत वीज पुरवठा करण्याचे काम सुरु असून डिसेंबर, २०१८ पर्यंत वीज पुरवठा करण्याचे महावितरण कंपनीकडून नियोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कवठा केज (ता.औसा, जि.लातूर) येथील पथदिव्यांचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) १११९७८ (०४-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवठा केज (ता.औसा, जि.लातूर) येथील पथदिव्यांचे खांब व लाईन पडल्यामुळे गावातील विद्युत पुरवठा गत दोन वर्षापासून बंद असल्याची बाब सन २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व सदर खांब उभे करून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
कवठा केज (ता.औसा, जि.लातूर) या गावात पथदिव्यांचे खांब व लाईन पडल्यामुळे गावातील विद्युत पुरवठा गेल्या दोन वर्षापासून बंद असल्याची बाब सन २०१७ मध्ये निदर्शनास आली नाही. पथदिव्यांचे खांब पडल्यामुळे गावातील विद्युत पुरवठा कुठेही खंडीत झालेला नाही अथवा कोणत्याही ग्राहकाचा विद्युत पुरवठा पथदिव्याचे खांब पडल्यामुळे बंद नाही. सद्यस्थितीत तेथील वीजपुरवठा सुरळीत चालू आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या कामकाजाचे मूल्यमापन करुन त्यात गुणात्मक सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत**

**(३०) १११७४६ (२१-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या कामकाजाचे मूल्यमापन करुन त्यात गुणात्मक सुधारणा करण्यासाठी अप्पर निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय यांच्या अध्यक्षतेखाली चार जणांची समिती माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नियुक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी समितीने अहवाल सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०८-२०१८) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) समितीचे कामकाज चालू असून माहिती मागविण्याचे कामकाज सुरु आहे.
(३) लागू नाही.

---

**पुणे जिल्हयातील भू-विकास बँकेच्या सभासदांच्या मालकी हक्काची जागा सभासदांच्या ताब्यात राहण्याबाबत**

**(३१) ११२१४४ (२१-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील भू-विकास बँकेच्या सभासदांच्या मालकी हक्काची जागा सभासदांच्या ताब्यात राहण्याबाबत व हवेली शाखा स्थलांतरीत न करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री यांना दिनांक १४ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) पुणे जिल्हा ग्रामिण व बहुउद्देशीय विकास सह. बँक मर्या., पुणे या बँकेचे दिनांक २७.११.२०१७ रोजी अवसायनाचे अंतीम आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ज्या शाखांचे वसुलीचे कामकाज बंद होते अशा शाखा बंद करुन त्यांचे विलिनिकरण करण्यात आले. भू-विकास बँकेची हवेली शाखा बंद करण्यात येऊन प्रशासकीय कारणास्तव सदर शाखेचे स्थलांतर बँकेच्या मुख्य शाखेत दिनांक ०९.०८.२०१७ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ऐनघर ग्रामपंचायत (जि.रायगड) हद्दीमध्ये येणा-या बाळसई गावामध्ये बसविण्यात आलेल्या खांबांची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(३२) ११२६८४ (०४-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐनघर ग्रामपंचायत (जि.रायगड) हद्दीमध्ये येणा-या बाळसई गावामध्ये बसविण्यात आलेल्या खांबांची दुरवस्था झाली असून सदरचे खांब बदलण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी महावितरणकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सहाय्यक अभियंता, महावितरण, नागोठणे यांनी सदर गावामध्ये जाऊन पाहणी केली असता गावातील लघुदाब वाहिनीचा एक लोखंडी पोल व त्याचा स्टे गंजलेल्या स्थितीत आढळून आला.
(३) दिनांक ०५.०१.२०१८ रोजी ठेकेदारामार्फत तातडीने सदरील पोल बदली करुन सुस्थितीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणार शहरालगत असलेल्या (जि.बुलढाण) पांग्रा डोळे येथील गावामध्ये वीज पुरवठा बंद असल्याबाबत

**(३३) ११२८९९ (०४-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार शहरालगत असलेल्या (जि.बुलढाणा) पांग्रा डोळे येथील गावामध्ये रोहित्र जळाल्याने गत तीन महिन्यांपासून वीज पुरवठा बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावाला तातडीने विद्युत पुरवठा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) मौजे पांग्रा डोळे गावातील वीज पुरवठा करणारे रोहित्र तांत्रिक कारणास्तव नादुरुस्त झाले होते. परंतु पर्यायी (Double Supply) वीज पुरवठा करणाऱ्या यंत्रणेव्दारे येथील विद्युत ग्राहकांना इतर रोहित्रावरुन विद्युत पुरवठा करण्यात आला.
(३) मौजे पांग्रा डोळे गावातील विद्युत रोहित्रांचे नादुरुस्तीचे प्रमाण कमी करण्यासाठी गावातील लघुदाब वाहिनी वरील वीज जोडण्यांची समान भारामध्ये विभागणी करण्यात आली व यंत्रणेची तपासणी करून पुनश्च: देखभाल दुरुस्ती करण्यात आली आहे.

---

### बुलढाणा जिल्हयात अवैध सावकारीचा व्यवसाय मोठया प्रमाणात वाढल्याबाबत

**(३४) ११२९४३ (२०-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात अवैध सावकारीचा व्यवसाय मोठया प्रमाणात वाढल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैध सावकारांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३०-०८-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) प्राप्त झालेल्या अवैध सावकारी बाबतच्या तक्रारीची चौकशी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अन्वये करण्यात येऊन प्रकरण गुणवत्तेनुसार निकाली काढण्यात येतात.

त्यानुसार प्राप्त झालेल्या ४०४ तक्रारींपैकी ३४३ प्रकरणात चौकशी पुर्ण झाली आहे. या ३४३ प्रकरणांपैकी ३०८ प्रकरणात बेकायदेशीर सावकारी आढळून आलेली नसल्याने ही प्रकरणे निकाली काढली आहेत. उर्वरीत ३५ प्रकरणात बेकायदेशीर सावकारी आढळून आली असून अधिनियमाच्या कलम १८ (१) नुसार कार्यवाही सुरु आहे. सदर ३५ प्रकरणांपैकी १४ प्रकरणी अधिनियमाच्या कलम ३९ अंतर्गत कार्यवाही करण्यात येऊन संबंधीत ४ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्हयात महावितरणच्या चंद्रपूर परिमंडळात गत वर्षात सुमारे दोन कोटी ४३ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याबाबत

**(३५) ११३०४६ (०४-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात महावितरणच्या चंद्रपूर परिमंडळात गत वर्षभरात सुमारे दोन कोटी ४३ लाख रुपयांची वीजचोरी करण्यात आल्याची माहिती महावितरणच्या पाहणीत आढळून आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजचोरी प्रकरणात किती जणांवर कारवाई करण्यात आली आहे वा दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर वीज चोरी प्रकरणात एकूण १५५० जणांवर महावितरण मार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कर्जमाफीची योजनेतील एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत वसूली झाली नसल्याबाबत**

**(३६) ११४०१६ (२०-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत अपेक्षित वसूली झाली नसल्याने राज्यातील सर्व जिल्हा भू-विकास बँकानी याबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी माहे डिसेंबर, २०१७ च्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३०-०८-२०१८) :** (१) अंशत : खरे आहे.

(२) थकीत कर्जाची वसुली होण्यासाठी व शेतक-यांना व्याजामध्ये मोठया प्रमाणात सवलत मिळण्यासाठी शासनाने दि.२८/०९/२००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये एक रकमी कर्ज सवलत (OTS) योजना लागू केली आहे. सदर योजनेचा शेतक-यांना लाभ घेता यावा म्हणून या योजनेस वेळोवेळी दिनांक ३१/३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परळी (जि.बीड) तालुक्यातील ग्रामस्थांना संजय गांधी निराधार अनुदान योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत.**

**(३७) ११४०५२ (०४-०४-२०१८). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि.बीड) तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीतील आर्थिक सहाय्य मिळावे याकरीता ग्रामस्थांनी तहसिलदार, परळी यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून अर्ज केलेल्या किती ग्रामस्थांचे अर्ज आजमितीस मंजूर होऊन त्यांना संजय गांधी निराधार योजना लागू करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त कालावधीत या योजनेचा लाभ मिळावा म्हणून अर्ज केलेल्या एकाही निराधार ग्रामस्थांना तहसिलदार, परळी यांचेकडून लाभ मिळालेला नाही, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी अर्ज केलेल्या सर्व ग्रामस्थांना नियमानुसार विनाविलंब सदर योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०८-२०१८) :** (१) तहसिलदार परळी यांच्याकडे ग्रामस्थांनी आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी अर्ज केले आहेत.
(२) व (३) परळी तालुक्यामध्ये १ जानेवारी, २०१७ ते ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीत संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत ८३८ व श्रावणबाळ सेवा राज्यनिवृत्तीवेतन योजनेअंतर्गत ७१८ असे एकूण १५५६ अर्ज ग्रामस्थांनी केले आहेत. दि. २७/०३/२०१८ रोजी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची बैठक घेण्यात आली असून त्यामध्ये ९८५ अर्ज मंजुर, २०५ अर्ज नामंजुर व ३६६ अर्ज त्रुटी पुर्ततेसाठी प्रलंबित ठेवण्यात आले आहेत.
(४) संजय गांधी निराधार अनुदान योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर तातडीने निर्णय घेण्याबाबत जिल्हा धकारी/ तहसिलदार यांना वेळोवेळी शासनामार्फत सूचना दिल्या जातात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांना सवलतीच्या दरातील कर्ज वाटप करण्याबाबत**

**(३८) ११४३१५ (२३-०४-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हा बँकेने शेतकऱ्यांना सवलतीच्या दरातील कर्ज वाटप करणार नाही असा ठराव दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजीच्या बँकेच्या एका परिपत्रकाचा गैरवापर करुन मंजूर केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठरावामुळे शेतकऱ्यांचे सवलतीच्या दराचे पीक कर्ज बंद करुन ११ ते १३ टक्क्यांचे कॅश क्रेडिट कर्ज घेण्यास भाग पाडले जात असल्याने दुष्काळात असलेल्या शेतकऱ्यांना जादा दराने कर्ज दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन मनमानीपणे शेतकऱ्यांना लादण्यात आलेला ठराव रद्द करुन शेतकऱ्यांना सवलतीच्या दरातील कर्ज वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-०८-२०१८) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.
शेतकरी कॅश क्रेडीट कर्ज योजना सक्तीची नसून ऐच्छीक स्वरूपाची आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे मागणीनुसार व त्याला हवे असेल तरच कर्ज पुरवठा केला जातो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाळवा तालुक्यातील (जि.सांगली) शेतकऱ्यांना विदयुत जोडणी देण्याबाबत**

**(३९) ११४४७७ (०४-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळवा तालुक्यातील (जि.सांगली) महावितरण कंपनी कार्यालयाकडे तेथील शेतकऱ्यांनी शेतीपंपाना विदयुत जोडणी देण्याकरीता दिनांक १ एप्रिल, २०१३ पासून ते डिसेंबर, २०१७ पर्यंत किती अर्ज केले आहेत,
(२) असल्यास, त्यापैकी आतापर्यंत किती शेतीपंपाना विदयुत जोडणी देण्यात आली आहे,
(३) असल्यास, अद्याप ज्या शेतकऱ्यांच्या पंपाना वीज जोडणी दिली नाही त्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, ज्या शेतकऱ्यांना वीज जोडणी दिली नाही त्यांना ती त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) :** (१) वाळवा तालुक्यातील (जि.सांगली) महावितरण कंपनी कार्यालयाकडे कृषीपंपाना विद्युत जोडणी देण्याकरिता दिनांक ०१.०४.२०१३ पासून ते डिसेंबर, २०१७ पर्यंत ७०८५ शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत.
(२) त्यापैकी ५,९३६ कृषीपंपाना विद्युत जोडणी देण्यात आली आहे.
(३) व (४) राज्यातील मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या कृषिपंपाना उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) द्वारे वीज पुरवठा करण्याच्या योजनेस शासनाने मान्यता दिली असून सदर योजनेअंतर्गत प्रलंबित कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात येतील.

---

**राधानगरी, भुदरगड, आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचे लाभ न मिळाल्याबाबत**

**(४०) ११५५१८ (१९-०४-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी, भुदरगड, आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यात शासनाने घोषित केलेल्या कर्जमाफी योजनेमध्ये हजारो शेतकऱ्यांना अद्याप कर्जमाफी योजनेचा लाभ मिळाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा बँककेडून शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम अद्याप जमा करण्यात आली नसून यामध्ये कर्ज परतफेड करणाऱ्या भुदरगड तालुक्यातील ८०४६ शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप कर्जमाफीची रक्कम जमा झाली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफी योजनेची रक्कम तातडीने जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे, आपले सरकार पोर्टलवर अद्याप कर्जमाफी मिळाली नसल्याबाबतचे ऑनलाईन पाच अर्ज प्राप्त झालेले आहेत.
(२) नाही, पोर्टलवरून निर्गमित झालेल्या ग्रीन लिस्टमधील कोणताही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित ठेवलेला नाही. तसेच जिल्ह्यात अद्याप अपात्र ठरविण्यात आलेले शेतकरी निश्चित करणेत आलेले नाहीत.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून सदर योजनेअंतर्गत एकूण १,६८,६८१ लाभार्थ्यांना रु.३०५.६२ कोटीचा लाभ देण्यात आलेला आहे व भुदरगड तालुक्यातील ११,९२० लाभार्थींच्या खात्यावर रु.१८.८५ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुस्लीम मेहतर समाजास लाडपागे समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत

**(४१) ११५७१३ (१९-०४-२०१८). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्याक मुस्लीम मेहतर समाज गत काही वर्षापासून डोक्यावर मैला वाहून नेण्याचे काम करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त समाजातील मैला वाहून नेण्याचे काम करणाऱ्यांस सफाई कामगार म्हणून नियुक्ती देण्यासंदर्भात लाडपागे समिती गठीत केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत या समितीच्या शिफारशींवर शासनाकडून संथगतीने कार्यवाही होत असल्याने, या समाजावर अन्याय होत असून शासनाने उक्त शिफारशी कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०८-२०१८) :** (१) नाही.
(२) सफाई कामगारांच्या विविध बाबींसंदर्भात लाड-पागे समिती गठीत करण्यात आली होती.
(३) व (४) यासंदर्भात सामाजिक न्याय विभागाकडून दि.२१/१०/२०११, दि.२६/२/२०१४ व दि.११/३/२०१६ चे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले असून शासन स्तरावर संबंधित विभागांकडून कार्यवाही सुरु असून त्याचे पालन सर्व विभागांकडून होत आहे.

---

**तेलंगणा राज्याच्या धर्तीवर राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या समाजाच्या विकासासाठी विशेष विकास निधी अधिनियम करण्याबाबत**

**(४२) ११६२३९ (२७-०४-२०१८). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेलंगणा राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या लोकांच्या विकासासाठी विशेष विकास निधी अधिनियम करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना सविस्तर निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) तेलंगणा राज्याच्या धर्तीवर राज्यात अनुसूचित.जाती घटक कार्यक्रमासंदर्भात "महाराष्ट्र अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती विशेष विकास निधी (नियोजन, वाटप आणि वित्तीय साधन संपत्तीचा वापर) अधिनियम, २०१७" तयार करून वित्त, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन, प्रारूप अधिनियम मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४३) ११९५२७ (२६-०७-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ**

**(बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागांतर्गत समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी सन २००४ ते २००९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध योजनांमध्ये गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमुर्ती एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने राज्य शासनास आर्थिक गैरव्यवहारांचा सखोल अभ्यास करुन अहवाल सादर केल्यानंतर राज्य शासनाने न्यायमुर्ती गायकवाड समितीने केलेल्या शिफारशींचा अभ्यास करुन दोषीवर काय कारवाई करावी याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यासाठी माजी सनदी अधिकारी श्री.पी.डी.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली आणखी एक समिती नेमली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने न्यायमुर्ती गायकवाड समितीने शिफारस केल्याप्रमाणे अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सुमारे १०४ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराप्रकरणी किती अधिका-यांवर कारवाई केली आहे व त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन अंतिम कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

तथापि, न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाचा अभ्यास करून, शासनामार्फत करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्याकरीता श्री.पी.डी. करंदीकर, सेवानिवृत्त भा.प्र.से. या वरीष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) होय.

श्री.पी.डी.करंदीकर, सेवानिवृत्त भा.प्र.से. यांनी आपला अंतरीम अहवाल शासनास सादर केला आहे. त्यामध्ये, न्यायमूर्ती गायकवाड समितीच्या चौकशी अहवालामध्ये कार्यवाही शिफारस करण्यात आलेल्या बाबींचे पृथ:क्करण करून देण्यात आले आहे.

(३) गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये अनियमिततेची रक्कम रु.७२,७४,७४,८९१/- इतकी आहे. प्रस्तुत प्रकरणी दिनांक ३१.०७.२०१८ अखेर ६९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत (यामध्ये ४९ अधिकारी व ८ संस्थांचा समावेश आहे). तसेच, ९६ प्रकरणी विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोले (जि.अहमदनगर) येथील मॉर्डन हायस्कूल समोरील दारूचे दुकान हटविण्याबाबत**

**(४४) १२०५६८ (२७-०७-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॉर्डर्न हायस्कूल, अकोले शहर (जि. अहमदनगर) या शाळेजवळ असलेले दारुचे दुकान हटविण्यासाठी संस्थेच्या सर्व विभागातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पदाधिकारी यांनी दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास रास्तारोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेजवळ असलेल्या दारुच्या दुकानामुळे शाळेतील विद्यार्थी व परिसरातील नागरिक त्रस्त झाले असून त्याचा विपरीत परिणाम मुलांच्या मनावर होत असतानाही सदर दुकान बंद करण्याबाबत प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे रास्तारोको आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार सदरचे दारूचे दुकान हटविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही. सदर दुकान हे महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ व महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ च्या अटी, नियम व शर्ती यानुसार मागील ३५ वर्ष सदर जागी सुरु असून या मद्य विक्री दुकानाबाबत अशा प्रकारची तक्रार यापूर्वी प्राप्त झालेली नाही. तथापि, सदर आंदोलनाच्या अनुषंगाने चौकशी केली असता, सदर दुकानाच्या परिसरात अंडी विक्रीची गाडी उभी राहात असल्यामुळे मद्य पिणारे लोक तेथे थांबतात. त्यामुळे मुलांना शाळेत जाण्यास त्रास होत असल्याचा जबाब शाळेच्या मुख्याध्यापकाने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे नोंदविला आहे. त्यानुसार, अंडी विक्रीची गाडी हटविण्यात आली असून विद्यार्थ्यांना मद्यपींचा त्रास होऊ नये यासाठी अनुज्ञप्तीधारकाच्या वतीने एका नोकराची व्यवस्था करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील कोराडी महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपनीत काम करणा-या तसेच सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत**

**(४५) १२०९०७ (२८-०७-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील कोराडी महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपनीत काम करणा-या तसेच सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना शासनाची १ नोव्हेंबर २००५ पूर्वीची निवृत्ती वेतन

योजना लागू करा व शासनाने यासंबधी दिनांक ३१ डिसेंबर १९९६ ला घेतलेल्या ठराव क्र.६२४ ची अंमलबजावणी करा या मागणीसाठी सेवानिवृत्त कर्मचारी संघटना व सेवेतील वीज कर्मचारी संघटनानी आंदोलन करण्याचा इशारा माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास दिल्याचे उघकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०८-२०१८) :** (१) महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर वीज कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत महाराष्ट्र विद्युत मंडळाचा ठराव क्र. ६२४, दि.३१.१२.१९९६ ची अंमलबजावणी करणे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत तिन्ही कंपन्यांतील कार्यरत कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने दि.०७.०३.२०१८ च्या पत्रान्वये निवृत्तीवेतन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी ४८ तासांच्या संपाची नोटीस दिली होती. तसेच, वीज क्षेत्र बचाव संयुक्त कृती समितीने दि.२६.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये एक दिवसीय धरणे आंदोलन नोटीस दिली होती.
(२) व (३) या संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि.१६.११.२०१७ रोजी निवृत्तीवेतन योजनेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ठराव क्र. ६२४, दि. ३१.११.१९९६ बाबत योग्य तो निर्णय तीन महिन्यांच्या आत घेण्याबाबतचे आदेश दिले होते. त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाने “तिन्ही कंपन्यांची सध्याची आर्थिक स्थिती पाहता निवृत्तीवेतन योजना लागू करता येणार नाही. सबब, तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा निवृत्तीवेतन योजनेसंदर्भातील मंडळ ठराव क्र. ६२४, दि.३१.१२.१९९६ याची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही” असा मंडळ ठराव क्र.७१८/२०१८ दि.०६.०२.२०१८ रोजी पारित केला आहे.

---

## आदिवासी विकास विभागाच्या खाजगी नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यास पालकांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(४६) १२१०९३ (२६-०७-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाच्या मान्यतेने राज्यातील खाजगी नामांकित इंग्रजी माध्यम शाळेमधील विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यास शासनाकडून पालकांना मदत मिळत नाही मात्र आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचा मूत्यू झाल्यास पालकांना मदत मिळते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने खाजगी नामांकित इंग्रजी माध्यम शाळेमधील विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यास शासनाकडून पालकांना मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०९-२०१८) :** (१) व (२) शासकीय आश्रमशाळा किंवा नामांकित शाळेत अनुसूचित जमातिच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यास त्यास आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक शाआशा-२०१६/प्र.क्र.२०२/का-१३, दिनांक १९.६.२०१८ अन्वये पालकांना रुपये २.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्यात येते. त्यापैकी नामांकित शाळेसाठी रुपये १.०० लक्ष शासनाकडून व रुपये १.०० लक्ष संबंधित संस्थेकडून देण्यात येते. तर शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना संपूर्ण रुपये २.०० लक्ष शासनाकडून देण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील विमान निर्मिती प्रकल्पाबाबत**

**(४७) १२२१०५ (२६-०७-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात प्रथम विमानाची निर्मिती करणाऱ्या श्री.अमोल यादव या तरुणाला पालघर जिल्हयात जमीन दिल्याची घोषणा सरकारने केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मॅग्नेटिक महाराष्ट्र या गुंतवणूक परिषदेत अमोल यादवबरोबर राज्यशासनाने करारही केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विमान निर्मितीचा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी शासनाने
कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (३०-०८-२०१८) :** (१) नाही.

(२) मॅग्नेटिक महाराष्ट्र कॉव्हर्जन्स-२०१८ या औद्योगिक गुंतवणुक प्रदर्शन कार्यक्रमात श्री.अमोल यादव यांच्या विमान निर्मिती प्रकल्पाबाबत राज्य सरकारकडून गुंतवणुक हेतू करार करण्यात आला आहे.

(३) प्रस्तुत प्रकल्प प्रत्यक्षात साकार करण्यासाठी घटकासमेवत पुढील पाठपुरावा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील पारधी आवास घरकुल योजनेबाबत**

**(४८) १२४६५० (२६-०७-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाचे वतीने प्रधानमंत्री आवास योजनेसह पारधी समाजातील लाभार्थ्यां करिता पारधी आवास योजना राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी प्रकल्प विभागाचे वतीने सन २०१७-१८ या वर्षासाठी परभणी जिल्हयात किती घरकुल बांधकामांना मंजुरी देण्यात आलेली आहे,
(३) असल्यास, एकाही लाभार्थ्यांना पहिला हप्ता सुद्धा देण्यात आलेला नसून त्यास जबाबदार कोण आहे व त्यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०८-२०१८) :** (१) होय. पारधी विकास कार्यक्रमांतर्गत पारधी जमातीकरीता घरकुल योजना राबविली जाते.
(२) आदिवासी विकास विभागाचे वतीने सन २०१७-१८ या वर्षासाठी परभणी जिल्हयासाठी पारधी घरकुल योजनेअंतर्गत १८ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार १८ पात्र लाभार्थीना घरकुलांची मंजुरी देण्यात आलेली आहे.
(३) हे, खरे नाही.
मंजुर सर्व लाभार्थींना प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले असून यापैकी ११ लाभार्थींना घराच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार व्दितीय हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे व ८ लाभार्थींना तृतीय हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे. ही सर्व बांधकामे प्रगती पथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रकल्पातील बाधित शेतक-यास मोबदला मिळण्याबाबत

**(४९) १२५०३४ (०२-०८-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रकल्पात १९६२ साली मानपाडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकरी श्री.वामन वझे यांची २२ गुंठे उदरनिर्वाहाची शेतजमीन भूसंपादित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार संपादित जमिनीच्या बदल्यात १२.५० टक्के भूखंड देण्यात आलेला नसल्याने त्यांनी आमरण उपोषणे केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू भूखंड न देण्याची कारणे काय आहेत तसेच शेतजमीनीचा मोबदला तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) श्री.वामन वझे यांना दिनांक १९/०६/२०१५ रोजी १०० चौ.मी. भूखंडासाठी देकारपत्र देण्यात आले आहे.त्यांना भूखंडधारकांनी आणखी एक प्रकल्पग्रस्त भागीदार घेऊन भागिदारी संस्थेच्या नावे मोकळी जागा क्र. १६ मधून २०० चौ.मी. च्या भूखंड वाटपाची मागणी केली होती. प्रकल्पग्रस्तांना सुविधा क्षेत्रामधून भूखंडाचे वाटप करण्यात येते. तसेच मोकळया जागेमधून सुविधा क्षेत्रामध्ये रुपांतरित करण्यास दिनांक २१/०६/२०१८ रोजीच्या M.M.C. बैठकीमध्ये परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार भूखंड आरेखन व वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## चंद्रपूर व नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेतात बांधण्यात आलेल्या टॉवरच्या जागेचा आर्थिक मोबदला मिळण्याबाबत

**(५०) १२५९५१ (२८-०७-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६६ केव्ही व त्यापेक्षाही अधिक क्षमतेच्या अतिउच्च दाब पारेषण वाहिन्यांसाठी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, चिमूर व नागपूर जिल्हयातील भिवापूर, सावनेर आणि कळमेश्वर या तालूक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात अदानी पॉवर कंपनी व रिलायन्स पॉवर कंपनीच्या वतीने सन २०१२ पासून टॉवर उभारून लाईन टाकण्याचे काम शेतकऱ्यांच्या विनापरवानगीने व जबरदस्तीने कोणताही आर्थिक मोबदला न देता करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॉवरसाठी वापरण्यात आलेल्या शेत जमिनीचा आर्थिक मोबदला तातडीने मिळावा याकरिता गेल्या अनेक वर्षापासून संबधित तालुक्यातील शेतकरी मागणी करत असून तहसिलदार आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार अर्ज करून सुध्दा त्या अर्जावर अद्यापही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) चंद्रपूर व नागपूर जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीनुसार, चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी, चिमूर व नागपूर जिल्हयातील भिवापूर, सावनेर आणि कळमेश्वर या तालुक्यामध्ये रिलायन्स कंपनीकडून वाहिनी मनोरे उभारण्यात आले नाहीत.तसेच चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी,चिमूर या तालुक्यात अदानी कंपनीकडून वाहिनी मनोरा उभारण्याचे काम सुरु नाही. नागपूर जिल्हयातील भिवापूर तालुक्यातील मौजा माणकापूर, वणी, आलेसूर, नांद, पांजरेपार, सालेभट्टी

व उमरेड तालुक्यातील मौजा सिर्सी या गावातील शेतकऱ्यांनी मोबदला न मिळाल्याबाबत अर्ज सादर केले असून ते अदानी कंपनीकडे पाठविण्यात आले असून त्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच कळमेश्वर व सावनेर तालुक्यातील भूधारकांना नियमानुसार मोबदला अदा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.